जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
16 JUL 2021
लोकमत




'लोकमत रक्ताचं नातं' या उपक्रमाअंतर्गत शिवाजी विद्यापीठात आज, शुक्रवारी रक्तदान शिबिर होणार आहे. त्यात विद्यार्थी, प्राध्यापक, कर्मचारी आणि नागरिकांनी सहभागी व्हावे, असे आवाहन कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले. (छाया : आदित्य वेल्हाळ)

# शिवाजी विद्यापीठात आज रक्तदान शिबिर

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : 'लोकमत'तर्फे कोल्हापूर शहर आणि जिल्ह्यात 'लोकमत रक्ताचं नातं' हे महारक्तदान शिबिर विविध ठिकाणी होत आहे. या उपक्रमात शिवाजी विद्यापीठ सहभागी झाले आहे. विद्यापीठातील राजमाता जिजाऊ साहेब बहुउद्देशीय सभागृहात आज, शुक्रवारी (दि.१६) सकाळी नऊ ते दुपारी चार यावेळेत रक्तदान शिबिर होणार आहे.

या शिबिराचे संयोजन विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजना (एनएसएस) विभागाने केले आहे. शिबिरात विद्यापीठ आणि संलग्नित महाविद्यालयांमधील विद्यार्थी, प्राध्यापक, कर्मचारी सहभागी होणार आहेत.

रक्ताची गरज लक्षात घेऊन 'लोकमत' समूहाने रक्तसंकलनाचा जो राज्यव्यापी उपक्रम हाती घेतला आहे, तो अत्यंत स्तुत्य स्वरूपाचा आहे. सकारात्मक हेतूने अगदी योग्य वेळी लोकाभिमुख पाऊल उचलल्याने जनतेचा या उपक्रमाला मोठा प्रतिसादही लाभतो आहे. निरोगी आणि पात्र नागरिकांनी या उपक्रमात मोठ्या संख्येने सहभागी व्हावे आणि रक्तदान करावे, असे आवाहन कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले आहे.

16 JUL 2021

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# तणाव व्यवस्थापन काळाची गरज

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** काही दिवसांपासून संपूर्ण जग कोविड महामारीने त्रस्त असून, यामुळे अनेक समस्या मानवी जीवनात उभ्या राहिल्या असून, विद्यापीठ प्रशासनालासुद्धा अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहे. यातून कर्मचाऱ्यांसमोर समस्या निर्माण होत असून त्यांना विविध प्रकारच्या ताण-तणावाला सामोरे जावे लागत आहे. याचा परिणाम मानसिक आरोग्याबरोबर शारीरिक आरोग्यावर होत असून, यासाठी या ताण-तणावाचे योग्य व्यवस्थापन करण्याचे कौशल्य आत्मसात करणे काळाची गरज असल्याचे मत शिवाजी विद्यापीठाचे माजी परीक्षा नियंत्रक शिक्षणतज्ज्ञ डॉ. बी. एम. हिर्डेकर यांनी व्यक्त केले.

शिवाजी विद्यापीठाच्या आजीवन अध्ययन व विस्तार अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ सेवक संघ व कौशल्य व उद्योजकता विकास केंद्रातर्फे आयोजित महाराष्ट्रातील विद्यापीठ कर्मचारी व त्यांचे कुटुंबीयांसाठी 'कोविड काळातील व्यवस्थापन' या विषयावरील पाच दिवसीय व्याख्यानमालेतील पहिले पुष्प डॉ. हिर्डेकर यांनी गुंफले. या वेळी प्रा. डॉ. ए. एम. गुरव, बाबा सावंत उपस्थित होते. ताण-तणाव योग्य व्यवस्थापनाने कमी करता येतो. तणाव नकारात्मक दृष्टिकोनातून जास्त होत असतो. यासाठी परिस्थितीकडे सकारात्मक दृष्टीने बघण्याची सवय करून घेणे गरजेचे असल्याचे डॉ. हिर्डेकर यांनी सांगितले.

16 JUL 2021 पुढारी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# सहसंचालक कार्यालयातील प्रकरणे झीरो पेंडन्सी करणार

## नूतन विभागीय उच्चशिक्षण सहसंचालक डॉ. कठरे यांचा विश्वास

कोल्हापूर : प्रवीण मस्के

कोल्हापूर विभागीय उच्चशिक्षण सहसंचालक कार्यालयातील अधिकारी, कर्मचाऱ्यांची आढावा बैठक घेतली आहे. पुढील काळात सहसंचालक कार्यालयातील प्रकरणांचा जलदगतीने निपटारा करून झीरो पेंडन्सी ठेवण्याचा प्रयत्न राहील, असा विश्वास नूतन कोल्हापूर विभागीय उच्चशिक्षण सहसंचालक डॉ. एच.एन. कठरे यांनी व्यक्त केला.

नवनियुक्तविभागीयसहसंचालक डॉ. कठरे यांनी गुरुवारी पदाचा कार्यभार स्वीकारून कामास सुरुवात केली. त्या अनुषंगाने त्यांच्याशी संवाद साधल्यानंतर पुढील काळातील नवीन उपक्रम, प्रलंबित प्रश्नांसंदर्भात त्यांनी भूमिका मांडली. डॉ. कठरे म्हणाले, सहसंचालक पदावर निवड झाल्याचा आनंद आहे. या पदाची कर्तव्ये, जबाबदाऱ्या योग्यरितीने पार पाडण्याचे काम करणार आहे. प्राध्यापक ते प्रशासकीय अधिकारी असा काम करण्याचा अनुभव वेगळा असणार आहे. गेल्या २० वर्षांतील शैक्षणिक अनुभव व महाविद्यालयात विविध समित्यांवर काम केल्याचा नक्कीच काम करताना फायदा होईल.

काही दिवसानंतर प्रलंबित प्रकरणांचा आढावा घेतल्यानंतर प्राध्यापक, कर्मचारी व शैक्षणिक संस्थांच्या अडचणी व समस्या सोडविण्याचा प्रयत्न असणार आहे. सहसंचालक कार्यालयात येण्याची वेळ येऊ नये, अशा पद्धतीने काम करण्यात येईल. सहसंचालक कार्यालयातील दैनंदिन कामाचा रोज आढावा घेतला जाईल व प्रलंबित कामे लवकर संपविण्यात येतील. प्राध्यापक व शिवाजी विद्यापीठातील अधिकाऱ्यांसमवेत समन्वय साधण्यासाठी नियोजन केले जाईल. प्रलंबित प्रश्नांच्या अनुषंगाने त्यांच्यासमवेत आढावा बैठका घेतल्या जातील. त्यांच्या अडचणी समजून घेऊन त्या लवकर कशा पद्धतीने सुटतील असा प्रयत्न राहील, असे डॉ. कठरे म्हणाले.

### दोन दिवसांत प्रलंबित प्रकरणांची यादी सादर करा

गेल्या दीड वर्षात सहसंचालक कार्यालयाच्या अंतर्गत अनेक तक्रारी आल्या आहेत. त्यासंदर्भात आढावा बैठकीत अनेकांनी गाऱ्हाणी मांडली आहेत. प्रलंबित प्रश्नांच्या अनुषंगाने सहसंचालकपदाचा कार्यभार स्वीकारल्यानंतर अधिकारी व कर्मचारी यांच्याकडून विभागाची माहिती घेतली आहे. दोन दिवसांत प्रलंबित प्रकरणांची यादी सादर करण्याचे आदेश दिल्याचे डॉ. कठरे यांनी सांगितले.